## निशाणी क्रं.३९ वर आदेश

अर्ज व त्यावरील आरोपी यांच्या खुलासाचे अवलोकन केले. फिर्यादीतर्फे वॉरंटचा आदेश होण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. फिर्यादीचे थोडक्यात कथन की, आजरोजी आरोपीच्या हजेरीकरिता तारीख नेमली आहे. आरोपी हा सतत तारखांवर गैरहजर राहत आहे. आरोपीने दि.३०.०७.१८ रोजी नि.क्रं.२० नुसार जामीन घेतल्यावर कधीही स्वतःहून वॉरंट निघाल्याशिवाय हजर झालेला नाही. यापुर्वी सुध्दा निशाणी क्रं.९,११,१४ नुसार वॉरंट काढल्यानंतर तो न्यायालयात हजर झाला होता. नि.क्रं.२७,३३ नुसार वॉरंटचा आदेश पारीत करण्यात आला आहे. आरोपी याने सुध्दा गैरहजेरी माफीचे अर्ज सादर केले आहेत. आरोपी सतत गैरहजर असल्याने नि.क्रं.३५ वर वॉरंटचा आदेश रद्द करण्याकरिता अर्ज केल्यावरुन दि.२९.०१.१९ रोजी न्यायालयाने आरोपीस न चुकता हजर राहण्याचे निर्देश दिले परंतू आरोपी हा त्यापुढील दि.१२.०२.१९ रोजी गैरहजर आहे. सबब आरोपीविरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश होणे आवश्यक आहे. अर्ज मंजूर व्हावा अशी त्यांनी विनंती केली.

२. आरोपीतर्फे अर्जावर पुरजोरपणे विरोध करण्यात आला. आरोपी यांच्या कथनानुसार फिर्यादीच्या प्रतिज्ञालेखासाठी प्रकरण नेमलेले आहे. फिर्यादीचा पुरावा असल्याने फिर्यादी न्यायालयात हजर नाही. आरोपी हा कर्ता पुरुष असून त्याचे वडील मागील वर्षी मयत झाले. त्याची आई वयोवृध्द असून नागपूर येथे ओकाड हॉस्पीटल येथे तिचा उपचार सुरु आहे. फिर्यादीच्या वकीलांनी अर्जात लिहिलेले कारण हे चुकीचे व कोर्टाची सहानुभूती मिळविणारे आहे. तरी आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज मंजूर करुन फिर्यादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकून घेवून अभिलेखाचे अवलोकन केले. आरोपी यांनी दि.२३.०७.१८ रोजी नि.क्रं.२० अन्वये जामीनाचा अर्ज दाखल केला. व त्यावरील आदेशान्वये आरोपीचा जामीन मंजूर करण्यात आला. त्यानंतर निशाणी क्रं.२६ अन्वये आरोपीने हैसियतचा दाखला दाखल करण्यास वेळ मागितला तो अर्ज न्यायालयाने मंजूर केला. त्यानंतर दि.१६.०८.१८ रोजी नि.क्रं.२७ अन्वये न्यायालयाने आरोपी विरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश पारीत केला. निशाणी क्रं.३१ अन्वये आरोपी याने त्याच्या विरुध्द पारीत झालेला गैरजमानती वॉरंट रद्द करण्यासाठी दि.१०.१२.१८ रोजी अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज न्यायालयाने पाचशे रुपयांच्या पेनॉल्टीवर व निर्देशासह मंजूर केला. त्यानंतर नि.क्रं.३३ अन्वये न्यायालयाने दि.१९.१२.१८ रोजी आरोपीविरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश पारीत केला. आरोपी याने नि.क्रं.३५ अन्वये त्याच्याविरुध्द पारीत झालेला आदेश रद्द होण्याकरिता अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज न्यायालयाने तीन हजार रुपयांच्या पेनॉल्टीवर व निर्देशासह मंजूर

केला. परंतू निशाणी क्रं.३८ अन्वये आरोपीविरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश पारीत करण्यासाठी फिर्यादीने अर्ज दाखल केला. व त्याचवेळी नि.क्रं.३७ अन्वये आरोपीने गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल केला . सदरचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला. निशाणी क्रं.३८ वर न्यायालयाने असा आदेश पारीत केला की, अर्ज हा पुढील तारखेस निकाली काढण्या तयेईल परंतू याआधीच न्यायालयाने आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज मंजूर केल्याने पुन्हा त्याच दिवशी म्हणजे दि.१२.०२.१९ रोजीचा अर्ज हा निरर्थक झाला आहे.

४. त्यानंतर आजरोजी प्रकरणामध्ये आरोपीचे विधीज्ञ हजर झाले व आरोपी गैरहजर. म्हणून फिर्यादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला. आरोपीचे वर्तन हे फिर्यादीच्या कथनास दुजोरा देत आहे. आरोपी हा न्यायालयात सातत्याने वारंवार गैरहजर आहे असे दिसून येते. आरोपी याची आई आजारी आहे व तो घरात एकटा कर्ता आहे. परंतू आरोपीला हे मागील तारखेस माहित होतेच की, न्यायालयाने त्याच्या विरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश रद्द केला त्यावेळेस त्यास पुढील तारखेस हजर राहण्याचे निर्देश दिले असे असतांना सुध्दा आरोपी हा त्यापुढील तारखेस म्हणजे दि.१२.०२.१९ रोजी गैरहजर राहिला. तरी सुध्दा न्यायालयाने नि.क्रं.३७ वरील अर्जात नमुद कारण की, व्यवसायानिमित्त बाहेर राज्यात गेलेला आहे यावरुन त्याची गैरहजेरी माफी मंजूर केली. याचाच अर्थ आरोपीस हे माहिती आहे की, आपल्या विरुध्द न्यायालयाने याआधी प्रकरणामध्ये गैरजमानती वॉरंट रद्द केले होते व त्यामध्ये त्यात पुढील तारखेस हजर राहण्याबाबत निर्देश दिले होते. आरोपीचे कारण की, तो त्याच्या आईसोबत उपचारासाठी नागपूर येथे गेला आहे याबाबत आरोपीतर्फे कोणतेही दस्तऐवज जोडले नाही.

५. आरोपीचे एकंदरीत वर्तन पाहता तुर्त तरी याक्षणी आरोपी हा न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. एकंदरीत विवेचनावरुन व अभिलेखावरील परिस्थितीवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

- आरोपीविरुध्द गैरजमानती वॉरंट आदेशिका शुल्क जमा केल्यानंतर निर्गमित करावा

जळगांव जामोद

दिनांक १४.०३.२०१९

आर.बी.डोळे

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

जळगांव जामोद

**निशाणी क्रं.४० वर आदेश**

अर्ज व त्यावरील फिर्यादी यांच्या खुलासाचे अवलोकन केले. आरोपीतर्फे गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल केला. आरोपीचे थोडक्यात कथन की, फिर्यादीचा पुरावा प्रतिज्ञालेखासाठी प्रकरण नेमले आहे. आरोपीची आई वयोवृध्द असून नागपूर येथे ओकाड हॉस्पीटल येथे तिचा उपचार सुरु आहे असे आरोपीने फोनद्वारे कळविले त्याकरिता आरोपी न्यायालयात हजर राहू शकत नाही. सबब आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

२. प्रस्तुतच्या अर्जावर फिर्यादीने पुरजोर विरोध केला. आरोपी आरोपी हा सतत तारखांवर गैरहजर राहण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या विरुध्द वॉरंट काढल्याशिवाय तो रद्द करण्यसाठीच आरोपी न्यायालयात हजर झालेला आहे. यापुर्वी सुध्दा निशाणी क्रं.९, ११, १४, २७,३३ नुसार आरोपी विरुध्द वॉरंट काढले होते. न्यायालयाने नि.क्रं.३५ वर वॉरंटचा आदेश पारीत करुन आरोपीस नियमित हजर राहण्याची ताकीद दिली होती व तीन हजार रुपये दंड केला होता. तसेच फौजदारी प्रकरण ४९५/१७ मध्ये आरोपीविरुध्द वॉरंटचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. आरोपी हा वेगवेगळी खोटी कारणे दर्शवून गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल केला आहे. आरोपीला कागदपत्र दाखल करण्याचे निर्देश दिले होते परंतू आरोपी हा न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नाही. वैद्यकीय उपचारासंबंधीचे दस्तऐवज जोडले नाही. सबब अर्ज पाचशे रुपये कॉस्ट बसवून खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

३. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकून घेवून अभिलेखाचे अवलोकन केले. आरोपी यांनी दि.२३.०७.१८ रोजी नि.क्रं.२० अन्वये जामीनाचा अर्ज दाखल केला. व त्यावरील आदेशान्वये आरोपीचा जामीन मंजूर करण्यात आला. त्यानंतर निशाणी क्रं.२६ अन्वये आरोपीने हैसियतचा दाखला दाखल करण्यास वेळ मागितला तो अर्ज न्यायालयाने मंजूर केला. त्यानंतर दि.१६.०८.१८ रोजी नि.क्रं.२७ अन्वये न्यायालयाने आरोपी विरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश पारीत केला. निशाणी क्रं.३१ अन्वये आरोपी याने त्याच्या विरुध्द पारीत झालेला गैरजमानती वॉरंट रद्द करण्यासाठी दि.१०.१२.१८ रोजी अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज न्यायालयाने पाचशे रुपयांच्या पेनॉल्टीवर व निर्देशासह मंजूर केला. त्यानंतर नि.क्रं.३३ अन्वये न्यायालयाने दि.१९.१२.१८ रोजी आरोपीविरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश पारीत केला. आरोपी याने नि.क्रं.३५ अन्वये त्याच्याविरुध्द पारीत झालेला आदेश रद्द होण्याकरिता अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज न्यायालयाने तीन हजार रुपयांच्या पेनॉल्टीवर व निर्देशासह मंजूर

केला. परंतू निशाणी क्रं.३८ अन्वये आरोपीविरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश पारीत करण्यासाठी फिर्यादीने अर्ज दाखल केला. व त्याचवेळी नि.क्रं.३७ अन्वये आरोपीने गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल केला . सदरचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला. निशाणी क्रं.३८ वर न्यायालयाने असा आदेश पारीत केला की, अर्ज हा पुढील तारखेस निकाली काढण्या तयेईल परंतू याआधीच न्यायालयाने आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज मंजूर केल्याने पुन्हा त्याच दिवशी म्हणजे दि.१२.०२.१९ रोजीचा अर्ज हा निरर्थक झाला आहे.

४. आरोपीचे वर्तन हे फिर्यादीच्या कथनास दुजोरा देत आहे. आरोपी हा न्यायालयात सातत्याने वारंवार गैरहजर आहे असे दिसून येते. आरोपी याची आई आजारी आहे व तो घरात एकटा कर्ता आहे. परंतू आरोपीला हे मागील तारखेस माहित होतेच की, न्यायालयाने त्याच्या विरुध्द गैरजमानती वॉरंटचा आदेश रद्द केला त्यावेळेस त्यास पुढील तारखेस हजर राहण्याचे निर्देश दिले असे असतांना सुध्दा आरोपी हा त्यापुढील तारखेस म्हणजे दि.१२.०२.१९ रोजी गैरहजर राहिला. तरी सुध्दा न्यायालयाने नि.क्रं.३७ वरील अर्जात नमुद कारण की, व्यवसायानिमित्त बाहेर राज्यात गेलेला आहे यावरुन त्याची गैरहजेरी माफी मंजूर केली. याचाच अर्थ आरोपीस हे माहिती आहे की, आपल्या विरुध्द न्यायालयाने याआधी प्रकरणामध्ये गैरजमानती वॉरंट रद्द केले होते व त्यामध्ये त्यात पुढील तारखेस हजर राहण्याबाबत निर्देश दिले होते. आरोपीचे कारण की, तो त्याच्या आईसोबत उपचारासाठी नागपूर येथे गेला आहे याबाबत आरोपीतर्फे कोणतेही दस्तऐवज जोडले नाही.

५. आरोपीचे एकंदरीत वर्तन पाहता तुर्त तरी याक्षणी आरोपी हा न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. एकंदरीत विवेचनावरुन व अभिलेखावरील परिस्थितीवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

- आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज हा रद्द करण्यात येतो.

जळगांव जामोद
दिनांक १४.०३.२०१९

आर.बी.डोळे
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
जळगांव जामोद